भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२०५/माहिती कक्ष/वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा

दिनांक ०२/०५/२०१७

**१) बेकायदेशीर जमाव जमवुन लोखंडी रॉडने मारुन व जिवानीशी मारण्याचा प्रयत्न केल्याने ~~केल्याने~~ गुन्हा नोंद :—**

दिनांक ३०/०४/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा शौचास करुन सिमेंट रोडने घरी परत येत असतांना यातील आरोपीतांनी प्राणघातक हल्ला करण्याचे समान उदिष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवुन फिर्यादी याला आरोपी क्र. १ याने लोखंडी रॉडने डोक्याचे डावे बाजुस मारुन तसेच आरोपी क्र. २ याने काठीने पाठीवर मारुन व आरोपी क्र. ३,४ आणि विधी संघर्ष बालक क्र. ५,७ यांनी फिर्यादीस लाथाबुक्यांने मारहान करुन जिवानीशी मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी उकेश मारोती चौधरी वय ३० वर्ष, रा. राजापुर यांचे तोंडी बयान व डॉ. परीक्षण व सिटीस्कॅन अहवालावरुन वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटींग पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे.

**२) अनाधिकृतपणे घरातमध्ये प्रवेश करुन मारहान करुन, जबरी अत्याचर करुन, मोटार सायकल, मोबाईल व नगदी पैसे चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/०४/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी हजर असतांनी आरोपीने तिचे घरात अनाधीकृतपने प्रवेश करुन फिर्यादी व तिचे मुलांना मारहान करुन तिचा मुलगा पळुन गेल्यावर नंतर तिला पटवुन देण्याची धमकी देवुन तिचे ईच्छे विरुध्द जबरी अत्याचार करुन त्याचे भितीने घराबाहेर बसली असतांना तिचे घरातील १ नोकीया कंपनीचा मोबाईल, पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ४२२३ व नगदी १,०००/—रु. असा एकुण ११,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे बयानावरुन व डॉक्टरी परीक्षण रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा अप क्र. ००/१७ कलम ३७६ (१),४५२,३८०,३२३,५०६ भादवि. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. बोरकुटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७६ (१),४५२,३८०,३२३,५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. बोरकुटे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) घराचा समोरील दाराचा पल्ला उघडुन लोखंडी आलमारीत ठेवलेल्या पैश्याची चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०४/२०१७ चे २१.३० वा. ते १/०५/२०१७ चे ७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपले घराला ताला लावुन दर्गा मध्ये झोपण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचा समोरील दाराचा पल्ला उघडुन आत प्रवेश करुन घरात असलेल्या लोखंडी आलमारीत ठेवलेले नगदी ७,५००/—रु. चोरुन नेल्याने फिर्यादी रवीकुमार गेदलाल गैतवास वय ४२ वर्ष, रा. राजगोपाल वार्ड आदीवासी शासकीय वस्तीगृहाचे समोर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दादंळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) मोटार सायकलच्या बॅटरीची चोरी . :—

दिनांक ०१/०५/२०१७ चे ००.३०ते ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपली टाटा सुमो गाडी क्र. एमएच ४४ बी ११३७ ही मज्जीद समोर उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन गाडीचे बोनेट खोलुन आत मध्ये असलेली एक लिव्हगार्ड कंपनीची बॅटरी किंमती ३,०००/—रु. ची चोरुन नेल्याने फिर्यादी अस्लम खान बशीरखान वय ४५ वर्ष, रा. बाबामस्तानशाह वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गलुले पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) घराचे समोरील दाराची कडी उघडुन आत प्रवेश करुन मोबाईलची चोरी . :—

दिनांक ३०/०४/२०१७ चे २१.३० ते २१.५० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही घराची समोरील दाराची कडी लावुन शेजाऱ्याकडे गेली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने समोरील दाराची कडी उघडुन आत प्रवेश करुन चॉर्जीगला लावलेला पांढरा रंगाचा विवो कंपनीचा वापरता मोबाईल किंमती ४,०००/—रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. डाली धम्मदीप मेश्राम वय २६ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

६) संगनमत करुन खुल्या झोपडीच्या कुटारामध्ये ठेवलेल्या पैश्याची चोंरी . :—

दिनांक ३०/०४/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी आपले आईसह घरी हजर असतांना घराला लागुन असलेल्या खुल्या झोपडीच्या स्वयंपाक खोलीतील कुटारामध्ये (जनावरांचा चारा) लपवुन ठेवलेले नगदी ४५,०००/—रु. यातील तीन अनोळखी आरोपीतांनी चोरुन घेवुन गेल्याने सौ. कांता भाष्कर मोहरकर वय ४५ वर्ष, रा. जुनोना येथे कलम ३८०,३४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

७) संगनमत करुन जादु टोना करतोस असे बोलुन बांबुच्या काठीने डोक्याला व हाताला मारहान करुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०१/०५/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सोमा महागु चौधरी वय ६४ वर्ष, रा. भागडी हा रस्त्याने जात असतांना आरोपीतांनी फिर्यादीला तु माझेकडे का पाहते तु जादु टोना करतोस असे बोलुन फिर्यादी सोबत झगडा भांडण करुन संगनमताने बांबुच्या काठीने आरोपी क्र. ३ ने मारहान करुन डोक्याला व हाताला दुखापत केली फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. सहकलम ३(२) म.रा.नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा जादु टोना प्रतीबंधक घालण्याबाबत व त्याचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनीयम २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

८) अवैध दारु अड्डयावर धाडी . :—

दिनांक ०१/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. आंधळगाव व लांखादुर येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हा.भ.दारू किंमती ५००/—रु, ०३ लीटर २४० मीली.लीटर देशी दारू. किंमती ९००/—रु, असा एकुण किंमती १४,००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.